# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३७/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. यशवंत दत्तात्रय नाईक,<br>संभाजी नाईक टी.सी. जवळ, नाईक मळा,<br>इचलकरंजी, जि. कोल्हापूर. | अपेलंट |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>मंडळ कार्यालय, ताराबाई पार्क,<br>कोल्हापूर.<br><br>२) कार्यकारी अभियंता(संवसु)<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>विभागीय कार्यालय इचलकरंजी,<br>इचलकरंजी, जिल्हा–कोल्हापूर.<br><br>३) सहाय्यक अभियंता (संवसु),<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>ग्रामीण उपविभाग, इचलकरंजी(आर),<br>जिल्हा–कोल्हापूर.<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :–** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. यशवंत दत्तात्रय नाईक व इतर ६५, रा. इचलकरंजी यांनी नवीन वीज कनेक्शन न मिळाल्याबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडळ कार्यालय, कोल्हापूर येथे विहीत नमुन्यांत तक्रार नोंदविली होती. त्याकामी कक्षाने दि. १०–७–२००७ रोजी दिलेला आदेश मान्य न झाल्याने श्री. नाईक यांनी स्वत:साठी तसेच अन्य ६५ ग्राहकांसाठी प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

प्रकरणी सुनावणीची तारीख ५–१०–२००७ रोजी विभागीय कार्यालय इचलकरंजी येथे नेमली होती. सुनावणीचे सुरूवातीसमंचाचे वतीने स्पष्ट करण्यांत आले की महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा–हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील तरतुदीनुसार ग्राहकास सामुहिकरित्या मंडळ पातळीवरील अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये तसेच परिमंडळ पातळीवरील ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये तक्रार दाखल करतां येत नसल्याने प्रकरणी फक्त श्री. यशवंत नाईक यांचे तक्रारीचा विचार करतां येईल. सुनावणीचेवेळी श्री. नाईक स्वत: उपस्थित न राहिल्याने व त्यांनी अन्य इसमास प्रतिनिधी म्हणून नामनिर्देशीत केले नसल्याने त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा, प्रस्तुतचे अपीलाचेकामी निर्णय देतांना, विचार करण्याचे उपरोक्त विनियमाच्या तरतूदीनुसार मंचाने ठरविले. वि.प. चे वतीने श्री. पी.व्ही. कांबळे, नोडल ऑफीसर, मंडळ कार्यालय, कोल्हापूर, श्री. एस.आर. कांबळे, कार्यकारी अभियंता, इचलकरंजी, श्री. सूर्यवंशी, उपकार्यकारी अभियंता, इचलकरंजी व श्री. दानोळीकर, कनिष्ठ अभियंता, इचलकरंजी हे उपस्थित होते. वि.प. यांचेवतीने श्री. दानोळीकर, यांनी असे सांगितले की श्री. यशवंत नाईक यांनी ९ एच.पी. चे नवीन वीज कनेक्शन मिळण्यासाठी वि.प.कडे दि. २९–१२–२००५ रोजी अर्ज केला होता. त्या ठिकाणालगत असलेल्या २०० एच.पी. रोहित्रावरून यापूर्वीच २४० चा लोड दिला गेला असल्याने ग्राहकास त्यावरून कनेक्शन देणे अशक्य आहे. श्री. नाईक यांना ९ एच.पी. चे वीज कनेक्शन देण्यासाठी एच.टी., एल.टी. लाईनची उभारणी आवश्यक आहे तसेच नवीन रोहित्राची आवश्यकता आहे. त्यास अनुसरून त्यांनी वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ (Augmentation) करण्यासाठी योजना तयार करून मंजुरीसाठी सादर केली आहे. त्यामध्ये श्री. नाईक यांचेसह निवेदनांमधील अन्य ग्राहकही सामिल आहेत. श्री. दानोळीकर यांनी पुढे असे सांगितले की श्री. नाईक यांनी ९ एच.पी. चे नवीन कनेक्शन मिळण्यासाठी दि. २९–१२–२००५ रोजी अर्ज केल्यापासून आजपर्यंत त्यांनी वि.प. ना समक्ष भेटून अगर पत्र पाठवून चौकशी केलेली नाही. तरीही दरम्यानचे कालावधीत वि.प.ने सदरचे ग्राहकास तसेच अन्य प्रलंबित ग्राहकास लवकरांत लवकर नवीन वीज कनेक्शन देण्याचे दृष्टीने प्रयत्न केले आहेत व त्याचाच एक भाग म्हणून याकामी वीज कंपनीने राहित्र व A.B. स्वीच बोर्ड उपलब्ध केला आहे. मात्र वीज कनेक्शन देण्यासाठी डिस्ट्रीब्यूशन बॉक्सची कमतरता आहे. सदरची कमतरता दूर करण्याचे दृष्टीने श्री. कांबळे, नोडल ऑफीसर, तथा कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय, कोल्हापूर यांनी प्रकरणी आवश्यक असलेला डिस्ट्रीब्युशन बॉक्स त्वरित उपलब्ध करून देण्याचे मान्य केले जेणेकरून ग्राहकाचे व्यवसाय उभारणीस होत असलेला विलंब तसेच व्यवसायाची नुकसान टळेल. तसे झाल्यास ग्राहकास एक महिन्याचे आंत नवीन वीज कनेक्शन देण्यास वीज कंपनीस कसलीही अडचण नसल्याचे वि.प.चे वतीने सांगण्यांत आले. त्यास अनुसरून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वि.प. यांनी कबुल केल्या प्रमाणे अपीलदार श्री. नाईक यांना या आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत नवीन वीज कनेक्शन द्यावे व तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतूदीनुसार मंचास दि. २५–११–२००७ पर्यंत कळवावे.

२. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| ( एस.आर बांबळे ) | ( जी. सी. लेले ) | ( के. व्ही. पाटील ) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |